# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०७/०८/२०२२ (रविवार)

---

. **चाकु ने वार करून गंभीर जखमी करणा–या आरोपीस अटक**

**पोलीस स्टेशन सावनेर :–** अंतर्गत खापा फाटा, ॲटों स्टॅन्ड, पाटणसावंगी येथील फिर्यादी जखमी मोरेश्वर दादुजी गायकवाड वय.४५ वर्ष रा.वाकोडी तह.सावनेर जि.नागपुर हे दिनांक ०६/०७/२२ रोजी सकाळी ०९/३० वा दरम्यान त्यांचा मालकीची टाटा मॅजीक क्रमांक एम.एच.४०.के.आर. ०१६६ ने पाटणसांवगी येथील आरामशीन मधुन लाकडी पाट्या घेवुन वाकोडी येथे जात असंताना, खापा फाटा पाटणसांवगी येथे ॲटो चालक आरोपी नामे – नसीर बानवा रा.पाटणसांवगी याने फिर्यादिशी **"माझे नंबर असतांना तु सवारी कसे काय नेत आहे" या कारणावरून भांडण केले व फिर्यादीला जिवे मारण्याचा उददेशाने फिर्यादीच्या छातीचा डावे बाजुच्या वरच्या भागावर चाकु ने वार करून गंभीर जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली.**

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोस्टे सावनेर येथे आरोपी नामे –नसीर वल्द अब्दुल शहा बानवा वय ४८ वर्ष रा. वार्ड न ४ पाटणसावंगी तहसील सावनेर जि. नागपूर आरोपीविरूध्द कलम ३०७,५०४, ५०६ भा.दवि. अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– सहायक पोलीस निरीक्षक श्री निशांत फुलेकर पोस्टे सावनेर मो.क्र ७५८८५६४३०० हे करीत आहे.

**जबरी संभोग**

**पोलीस स्टेशन खापरखेडा :–** अंतर्गत सन २०२२ एप्रिल ते दिनांक ०६/०८/२०२२ चे १३/३० वा पावेतो, यातील पिडीता फिर्यादी वय १३ वर्षे हीला आरोपी नामे– रोहीत सुरदास सोनेकर वय अंदाजे २६ वर्ष रा वार्ड नं ३ गुमथी यांचेसोबत लग्नामध्ये ओळख झाली, ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले पिडीता व आरोपी यांची शाळेत येता जाता भेट होत होती. माहे/एप्रिल महिन्यात आरोपी याने आपण फिरायला जावु, असे बोलुन पिडीतेला घेवुन घोगली शिवारातील हरीश्चंद्र ढेंगरे यांचे शेताजवळील पांदनीच्या लगत असलेल्या लिंबाचे झाडाखाली घेवुन गेला व पिडीतेसोबत शारीरिक संबध केला आणि घडलेली गोष्ट कोणालाही सांगण्यास मनाई केल्याने पिडीतेने घरी कोणालाही सांगितले नाही

दि.०६.०८.२२ रोजी पिडीता फिर्यादी पिडीता ही वेळ ११/४५ वा सुमारास शाळेतुन घरी आली असता, आरोपी दुपारी ०१.३० वा सुमारास गाडी घेवुन घरी आला. त्यावेळी पिडीतेच्या घरचे लोक कामाले गेले असतांना रोहीतने पिडीतेला ईशारा करून त्याच्या घरी येण्यास सांगितले पिडीतेने मनाई केली असता "मी मरून जातो" असे म्हटल्याने पिडीता भितीपोटी त्याच्या घरी गेले, त्यावेळी त्याच्या घरी कोणीही नव्हते, तेव्हाही त्याने जबरदस्ती पिडीतेसोबत जबरी संभोग केला. व कोणालाही काहीही सांगु नको, जर कोणाला सांगशील तर "तुला खत्म करून टाकतो व मी स्वता मरून जातो" अशी धमकी दिली.

सदर फिर्यादी पिडीतेचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपी नामे– रोहीत सुरदास सोनेकर वय अंदाजे २६ वर्ष रा वार्ड नं ३ गुमथी यांचे विरूध्द कलम– ३७६(३) .३७६(२)(र).३७६(२)(छ). ५०६ भादवी सह कलम ४.६ पोक्सो ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास महीला सहायक पोलीस निरीक्षक लक्ष्मी मलकुवार पो स्टे खापरखेडा मो नं ९६२३६८७६२७ करीत आहे.

## जबरी चोरी करणा—या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कन्हान** :— अंतर्गत धरम नगर कन्हान १ किमी उत्तर.येथे दिनांक ०५/०८/२०२२ चे २२.३० वा. ते २३.०० वा दरम्यान, यातील फिर्यादी हा पान ठेल्यावरून घरी जात असता, यातील आरोपीतांनी जुन्या वादाच्या कारणावरून फिर्यादीस राजीकचे दुकानाजवळ थांबवुन आरोपी क्र १) **शुभम पंचम सलामे** व ईतर त्याचे ३साथीदार यांनी मिळुन फिर्यादीचे कॉलर पकडुन, त्याचा मोबाईल हिसकावुन चाकुने धमकावले, तसेच त्यातील एका आरोपीने खिशातील १४,०००/— रू काढुन घेतले व फिर्यादीने पळण्याचा प्रयत्न केला असता, त्याला चाकू फेकुन मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शिवम बलीराम पुरी वय १७ वर्ष रा. शिवाजी नगर कन्हान.यांचे रिपोर्टवरून पोस्टे कन्हान येथे नमुद चारही आरोपीविरूध्द कलम ३९२,३४ भा.द.वि अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पोलीस निरीक्षक श्री कदम पो.स्टे कन्हान मो. क्र. ७०८३७११९६९ हे करीत आहे.

## घरफोडी

**१.पोलीस स्टेशन मौदा** :— अंतर्गत मदनकर ले आउट श्रीनगर मौदा १ कीमी पुर्व. येथे यातील फिर्यादीने दिनांक ०५/०८/२०२२ चे १८/०० वा दरम्यान, बॅकेतुन काढुन आणलेले ८०,०००/— रु घरातील देवरुम मध्ये झाकुन ठेवलेले पैशे तिथेच ठेवुन फिर्यादी आपल्या घराला कुलुप लावुन, नागपुर येथे मुलीच्या घरी गेली व दि ६/८/२२ रोजी चे सकाळी ९/०० वा दर नागपुर वरुन मौदा येथे परत घरी आली असता, फिर्यादीला तीचे घराचे दरवाजाचे कुलुप तुटले दिसल्याने फिर्यादीने घराचे आत जावुन पैशे ठेवल्या ठिकाणी पाहीले असता ठेवलेले ८०,०००/—रु दिसुन आले नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने **फिर्यादीचे घराचे दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन देवघरात ठेवलेले नगदी ८०,००० रु चोरुन नेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— श्रीमती उषा ईश्वर धांडे वय ४८ रा श्रीनबर मदनकर ले आउट मौदा ता मौदा जि नागपुर यांचे रिपोर्टवरून पोस्टे मौदा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५७,४५४,३८०, भादवी अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री चौधरी पो स्टे मौदा मो.क्र ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

## घरफोडी

**२.पोलीस स्टेशन देवलापार** :— अंतर्गत पवनी ०६ की मी दक्षिण. येथे यातील फिर्यादी मनसर येथे गेले असता. कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील आलमारीचे लॉकर मधुन सोन्याचे मंगळसुत्र कीमती ४०,०००/—रू., सोन्याचे लॉकेट कीमती ४,०००/—रू, दोन लहाण मनगटे २ ग्रॅम किमती १२,००० /—रू, चांदीचे पायपट्टी १० ग्रॅम किमती १०,००० /— रू, चांदीचे कमरबंद ४ ग्रॅम किमती ४,०००/—रू असा **एकुन ७०,०००/—रू चा माल चोरून नेला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सचीन बेनीप्रसाद सोनवाने वय ३४ वर्श रा. वार्ड न. ०२ पवनी ता रामटेक यांचे रिपोर्टवरून पोस्टे देवलापार येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५४,३८०, भादवी अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— सपोनी बोरकुटे पोस्टे देवलापार मो क्र ९५४५६६७२२३ हे करीत आहे.

## अवैधरित्या जनावरांची वाहतुक करणा—या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :—अंतर्गत मौजा शिवाजी चौक पारशिवनी ०१ कि.मी. पुर्व. दिनांक ०६/०८/२२ चे सकाळी ०४/०० ते ०४/३० वा दर फिर्यादी व स्टॉफ नाकाबंदी करीत असता एक पांढ—या रंगाची बुलेरो पिकअप क्र. एम.एच.४९.ए.टी.१८८९ चा चालक आरोपी क्र. १) फिरोज नईम खान पठाण वय ३५ वर्षे रा. वार्ड क्र. ०८ सडक अर्जुनी जि. गोंदीया आरोपी क्र २) अजय इम्रता मेश्राम वय २२ वर्षे रा. चांगाटोला ता. गोरेगाव जि. गोंदीया हे नमुद वाहनामध्ये गोवंश जातीची **१) दोन बैल अंदाजे प्रत्येकी कि. ५,०००/—रू. एकूण कि. १०,०००/— रू. २) दोन गायी अंदाजे प्रत्येकी कि. ५,०००रू. एकूण कि. १०,०००रू. ३) आठ गायी अंदाजे प्रत्येकी किंमती ५,०००/—रू.एकूण किमती ४०,०००/—रू. असा एकूण ६०,०००/—रू. चे गोवंश जनावरे वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपीकडुन बुलेरो एम.एच.४९.ए.टी.१८८९ वाहनासी अंदाजे कि. ४,००,०००/—रू.असा एकूण ४,६०,०००/—रू चा मुदेमाल जप्त केला.**

सदर प्रकरणी फिर्यादी सर तर्फे पो.हवा. रविंद्र रूपचंद बर्वे पो.स्टे. पारशिवनी यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. पारशिवनी येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ११(१), (घ), (ड), (च), (ज) प्राण्यांना क्रुरतेने वागविणे प्रति. अधि. ५ (अ), (१), (२), ५ (ब)ए ११ प्राणी संरक्षण अधि. सह कलम ११९ महा.पोलीस अधि. सह कलम १०९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पोलीस उपनिरीक्षक ज्ञानोबा पळनाटे पो.स्टे. पारशिवनी मो.क्र.७३८७०८६१७८ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**